# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक ३१/०७/२०१८**

**सभा सुचना क्र. ०४ दु ११.०० वा.**

| अ क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | वसई विरार शहर महानगरपालिका सुर्या उद्‌भव १०० द.ल.ली. पाणी पुरवठा योजनेअंतर्गत अशुध्द व शुध्द पाण्याच्या M.S. जलवाहिनीस रंगकाम करणे तसेच जलवाहिनीवर शुध्द पाण्याच्या गुरुत्ववाहिनीवर Non Tempered Air Valve बसविणे कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- वरिलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देण्यास व पुढील निविदा कार्यवाही करण्यास हि सभा मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.विद्या पाटील सूचक :- मा.श्री.किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २. | वसई-विरार शहर महानगरपालिका उसगांव/शिरवली २० द.ल.ली. पाणीपुरवठा योजना अंतर्गत अशुध्द व शुध्द पाण्याच्या MS जलवाहिनीस रंगकाम करणे तसेच जलवाहिनीवरील Air Valve बदलणे कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- वरिलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देण्यास व पुढील निविदा कार्यवाही करण्यास हि सभा मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. दिक्षा घरत सूचक :- मा.श्री.पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ३. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती डी मधील वॉर्ड क्र.८७ मध्ये एव्हरशाईन सिटी येथील साई संस्कृती डेकोरेटर्स ते जाधवपाडा मेन रोड पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी होणा-या रक्कम रु.३९,९७,७८६/- इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री.पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| | करणेचे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | |
| ४. | मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदावर पदस्थापना व अधिकार प्रदान करणेबाबत. | ठराव :- मा. आयुक्त सो यांचेकडून कामकाज वाटपाचा व अधिकारी प्रदानाचा आलेला प्रस्ताव पाहणेत आला. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६८ व ६९ अन्वये मा. आयुक्त यांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार पालिकेच्या एखद्या विषयाचे / पदाचे कामकाज त्यांना योग्य वाटेल अशा व्यक्तीकडे मा. स्थायी समितीच्या मंजुरीने सोपवु शकतात. मा. आयुकत यांनी प्रस्तावित केल्यानुसार महानगरपालिकेच्या लेखा विभागात MFSA संवर्गातील नव्याने प्रतिनियुक्तीवर नियुक्त झालेल्या श्रीमती अनुजा किणी, सहाय्यक लेखा अधिकारी, गट - ब यांना मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदाचे अधिकार प्रदान केलेले आहेत. त्यास आजची ही सभा कार्योत्तर मंजुरी देत आहे. श्री. प्रशांत रत्नाकर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेकडे मा. आयुक्त यांनी प्रस्तावित केल्यानुसार श्री. रत्नाकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे तत्कालीन विरार नगरपरिषदेत त्यांना लेखापाल या पदाचा अनुभव तसेच महानगरपालिका स्थापनेनंतरचा मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदाचा अनुभव व महानगरपालिकेच्या स्थानीक परिस्थीतीची माहिती आहे. त्यानुसार श्री. रत्नाकर यांस महानगरपालिकेचे उत्पन्न वाढीचे व खर्चात काटकसर यासंबंधी संपूर्ण अभ्यास करून त्याचा स्वयंस्पष्ट मुद्देनिहाय अहवाल मा. स्थायी समितीपुढे सादर करावा. तसेच महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग समिती मधील लेखा विभागास भेटी देऊन त्यांचे कामकाज पाहणे व सुधारणा सुचविणे ही कामे श्री. रत्नाकर यास देणेस आजची ही सभा मंजुरी देत आहे.<br><br>**अनुमोदक :- मा.श्री.पंकज पाटील सूचक :- मा.श्री.किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ५. | वसई विरार शहर महानगरपालिकेची दैनंदिन जमा होणारी मालमत्ता कर, पाणीपट्टी व इतर जमा होणाऱ्या रकमा भरणा करणेकामी नव्याने बँका मध्ये बदल करणेबाबत. | ठराव :- प्रस्तावितत केल्यानुसार महानगरपालिकेचा कररुपाने जमा होणाऱ्या रक्कमांपैकी काही कराच्या रक्कमा कोटक महिंद्रा बँकेत जमा करण्यांत येत होत्या. कॉर्पोरेट क्षेत्रातील बँकांनी आपल्या उत्पनांतुन ठराविक रक्कम कॉर्पोरेट सोशिएल रिस्पॉन्सिबिलिटी अर्थात CSR म्हणून वापरणे अनिवार्य आहे. याबाबत सुचना देवूनही कोटक महिंद्रा बँक CSR निधी खर्च करतांना उदासिन राहिली व इडंस इंड बँक, एचडीएफसी बँक, ॲक्सीस बँक यांनी CSR अंतर्गत महापालिकेच्या योजनांना सहकार्य केले असून नजिकच्या काळात या निधीअंतर्गत विविध कामे करण्याचे प्रस्ताव सादर केलेले आहेत. सबब वसई विरार शहर महानगरपालिकेचे कोटक महिंद्र बँक यांचेकडील काम बंद करुन इंडस इंड बँकेस व ॲक्सीस बँक तसेच एचडीएफसी बँकेस रकमा स्विकारणेचे काम खालीलप्रमाणे विभागुन देण्यांस ही स्थायी समिती सभा मान्यता देत आहे . |

| प्रभाग समिती | मालमत्ता कर / इतर कर / अनामत | पाणीपट्टी |
|---|---|---|
| ए | इंडस इंड बँक | ॲक्सीस बँक |
| बी | इंडस इंड बँक | ॲक्सीस बँक |
| सी | इंडस इंड बँक | ॲक्सीस बँक |
| डी | इंडस इंड बँक | ॲक्सीस बँक |
| ई | इंडस इंड बँक | ॲक्सीस बँक |
| एफ | इंडस इंड बँक | ॲक्सीस बँक |
| जी | एच.डी.एफ.सी बँक | ॲक्सीस बँक |

| | | |
|---|---|---|
| | | एच — एच.डी.एफ.सी बँक — ॲक्सीस बँक<br>आय — एच.डी.एफ.सी बँक — ॲक्सीस बँक<br>**अनुमोदक :- मा.श्री. दिक्षा घरत   सूचक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ६. | विद्युत विभागाचे दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करीता तसेच इतर विभागात मंजूर पुरवठा करणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- प्रशासनाकडून सदरचा अहवाल पाहण्यात आला. त्यानुसार आजची ही सभा खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.<br>१) विद्युत विभागात अर्हता धारण न केलेल प्रशासनाकडून मंजूर झालेले २३ तारतंत्री व १ अतिरिक्त तारतंत्री कर्मचारी पूर्वीच्या मंजूर ठेकेदारच्या कालावधीपासून कार्यरत होते. अशा एकुण २४ तारतंत्री यांस दि. १६/०१/२०१८ पासून शैक्षणिक अर्हतेअभावी त्यांना वेतन आदा करणेत आलेले नव्हते. सदर २४ कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना मजुर या पदावर दि. १६/०१/२०१८ पासून सुधारीत कार्यदेश देऊन त्या कालावधीपासूनचे वेतन देण्यात यावे.<br>२) सामान्य प्रशासन विभागाती दि. १/०३/२०१८ पासून १० कार्यरत कर्मचारी हे शिपाई पदावर काम करीत असून सदर १० कर्मचाऱ्यांची शिपाई या पदाकरीता असलेली शैक्षणिक अर्हता धारण करीत नसल्याने त्यांना मजूर या पदावर नेमणूक करणेकामी मंजूर ठेकेदारास कार्यादेश देऊन दि. १/०३/२०१८ या कालावधीपासून त्यांना वेतन देणेस व त्यापोटी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यास आजची ही सभा मान्यता देत आहे.<br>३) मॅरेथॉन स्पर्धा व क्रिडा विभागासाठी माहे १ ऑगस्ट पासून ७ "मजुर" घेण्यात यावेत व तसा कार्यादेश संबंधीत ठेकेदारास देण्यात यावा. त्याप्रमाणे संबंधीत ठेकेदारास कार्यादेश देणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यास आजची ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत   सूचक :- मा.श्री. विद्या पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ७. | श्रीमती वेरोणिका रॉड्रिक्स ह्याचे वसई विरार शहर महानगरपालिका ह्यांचे वैदयकिय बिलापोटी झालेल्या खर्चाची प्रतिपुर्ती करण्याबाबत मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- प्रस्तावाचा मजकूर पाहता श्रीम. विरोणिका रॉड्रीक्स (लिपीक) ह्यांचे पती श्री. पॉलिकार्फ रॉड्रीक्स ह्यांना दिनांक दि. २३/१०/२०१७ ते ०६/११/२०१७ बॉम्बे हॉस्पीटल मुंबई येथे उपचार घेतल्या कामी झालेला खर्च रक्कम रु. ३,९४,३२१/- १०० टक्के रक्कमेची प्रतिपुर्ती करणेकामी ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. विद्या पाटील   सूचक :- मा.श्री. मा.श्रीम. दिक्षा घरत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ८. | प्रभाग समिती डी अंतर्गत नवघर पुर्व येथील स्मशानभुमीची दुरुस्ती करणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- उपरोक्त निविदाची तुलना करता मे. निल एंटरप्रायजेस यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा (०५%) कमी दराने सर्वात कमी व वाजवी आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळेकरीता व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. याकामी मनपातर्फे कायदेशीर बार्बीची पुर्तता करून संविदा करणेसाठी ही सभा मान्यता देत आहे. याकामी येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.पंकज पाटील   सूचक :- मा.श्री.किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| ९. | प्रभाग समिती डी आचोळे क्षेत्रातील विविध रस्त्यांवर लेनमार्क करणे व झेब्रा क्रॉसिंग मारणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे. संजय कंन्टस्ट्रक्शन हयांची निविदा (अंदाजपत्राकापेक्षा (-)१८% कमी दराने) सर्वात कमी व वाजवी आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेकरीता तसेच महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये हया कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त हयांनी मंजूरी दिली आहे. या कामी म.न.पा. तर्फे कायदेशीर बाबींची पूर्तता करुन संविदा करणेसाठी ही सभा मान्यता देत आहे व याकामी येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत सूचक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १०. | विरार (पू.) प्रभाग क्र.४ मध्ये नारिंगी बायपास रोडवर आदर्श शाळेजवळ कल्वर्ट बांधणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे. साई पोमू कन्स्ट्रक्शन हयांची निविदा (अंदाजपत्राकापेक्षा (-)११.००% कमी दराने) सर्वात कमी व वाजवी आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेकरीता तसेच महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये हया कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त हयांनी मंजूरी दिली आहे. या कामी म.न.पा. तर्फे कायदेशीर बाबींची पूर्तता करुन संविदा करणेसाठी ही सभा मान्यता देत आहे व याकामी येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम विया पाटील सूचक :- मा.श्रीम.दिक्षा घरत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ११. | कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) या पदावर सहा महिन्यांच्या कालावधीसाठी ठोक वेतनावर नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यास मुदतवाढ देणेबाबत. | ठराव :- संगणक विभागातील कामाची निकड पाहता ठोक वेतनावरील श्री. हर्षल रघुनाथ पाटिल, कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर), संगणक विभागातील कामाची निकड लक्षात घेता यांना पुढील सहा महिन्याचे मर्यादेत एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन कलम ५३ (३) अन्वये नेमणूक करण्यास, तसेच ठोक वेतनावरील खर्चास आजची ही महासभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. सदर खर्च महानगरपालिकेच्या "सामान्य प्रशासन (ई-गव्हर्नन्स)" या लेखाशिर्षामधून भागविण्यात यावा.<br>**अनुमोदक :- मा.श्री.किशोर पाटील सूचक :- मा.श्री.पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १२. | डास नियंत्रण व डास निर्मुलन करणेकामी जंतुकिटकनाशके खरेदी करण्यास मंजुरी मिळणेबाबत. | ठराव :- उपरोक्त नमुद प्रस्तावाचे अवलोकन करणेत आले. प्रस्तावित मजकुरामध्ये नमुद जंतुकिटकनाशके मंजुर अभिकर्त्यांकडून खरेदी करणेकामी अपेक्षित रु.३०,१६,६८२/- इतक्या खर्चास ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १३. | श्री.सखाराम शंकर महाडीक, व श्री कन्हैय्या मनोहर भोईर सदस्य, स्थायी समिती यांनी दिलेले सदस्य पदाचे राजीनामे मा.स्थायी समितीच्या महितीस्तव | ठराव :- प्रस्तावाबाबत नमूद असल्याप्रमाणे स्थायी समिती सदस्य श्री. सखाराम शंकर महाडिक व श्री. कन्हैय्या (बेटा) मनोहर भोईर यांनी मा.स्थायी समितीच्या सभापती यांचेकडे सादर केलेले वरील राजीनामे मान्य करण्यांत येत असून सदर रिक्त झालेल्या दोन्हीही जागांवर नव्याने सदस्यांच्या नेमणुका करणेचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे सादर करावा अशी आजची सभा ठरवित आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सुदेश चौधरी सूचक :- मा.श्री.महेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| १४. | पाणी पुरवठा विभागास दोन अवजड वाहन चालक व एक तारतंत्री उपलब्ध होणेबाबत. | ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेतील कंत्राटी पध्दतीवर पाणी पुरवठा, मुख्यालय येथे पुर्णवेळ दोन अवजड वाहन चालक व एक तारतंत्री उपलब्ध करुन देणेस तसेच सबंधीत ठेकेदारास आदेशीत करण्यात व येणाऱ्या खर्चास आजची ही मा. स्थायी समिती सभा वित्तीय व प्रशासकिय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री.पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १५. | कंत्राटी २९ कनिष्ठ अभियंत्यांना दि.१६/०१/२०१८ ते दि.२०/०४/२०१८ या कालावधीचे वेतन अदा करणेकामी प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- प्रशासनाकडून पाहणेत आला. त्यानुसार महानगरपालिकेच्या कंत्राटी पध्दतीवर २९ कनिष्ठ अभियंता (ठेका) यांना दि. १६/०१/२०१८ पासून ते दि. २०/०४/२०१८ पर्यंतच्या कालावधीचे वेतन आदा करणे व त्यासंबंधी मंजूर ठेकेदारास उपरोक्त कालावधीकरिताचे कार्यादेश देणेकामी व सदरचे वेतनापोटी येणाऱ्या खर्चास आचजी मा. स्थायी समिती सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.किशोर पाटील सूचक :- मा.श्री.सुदेश चौधरी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १६. | सन २०१७-२०१८, २०१८-१९ व २०१९-२० या त्रैवार्षिक निविदेत पुरविण्यात आलेल्या ठेका कर्मचाऱ्यांना ESIC योजना लागू करणेबाबत. | ठराव :- प्रशासनाचा अहवाल पाहण्यात आला. सन २०१७-१८ ते सन २०१९-२० या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता मनुष्यबळ पुरविणेकामी संवर्गनिहाय ठेकेदाराची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर नियुक्ती करतेवेळी निविदेतील अटी-शर्तीमध्ये वेतनानुसार भरावयाच्या दरामध्ये कर्मचाऱ्याचे वेतनातून गटविमा रक्कम रु. १००/- कपात केला जाणार होता. त्यावर महापालिकेकडून कोणत्याही प्रकारचे अंशदान दिले जाणार नव्हते. सदर गटविमाऐवजी शासनाच्या धोरणानुसार ईएसआयसी योजना लागू करणे कंत्राटी कर्मचाऱ्यांचे एकूण वेतन रक्कम रु. २१०००/- पेक्षा कमी आहे, त्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या वेतनातून १.७५ टक्के रक्कम कपात केली जाईल व महानगरपालिकेकडून ४.७५ टक्के अंशदान तसेच शासनाकडून वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार त्यांना सदरची अंशदान रक्कम आदा केली जाईल. सदरची योजना मंजूर निविदाधारकाला देण्यात आलेल्या कार्यादेशापासून देणेकामी सुधारीत आदेश ठेकेदारास देण्यात यावा.यास्तव ज्यांचे वेतन रक्कम रु. २१०००/- पेक्षा जास्त असेल त्यांना ईएसआयसी योजना लागू होणार नाही. त्याकरीता सदर कर्मचाऱ्यांच्या स्वेच्छेने गटविमा योजना लागू करावयाची असल्यास संबंधीत मंजूर ठेकेदारांकडून त्याबाबत स्वतंत्र अहवाल सादर करुन शासनाच्या अन्य विमा कंपनीकडून सदरचा लाभ घेणेकामी व उपरोक्त ईएसआयसी योजना लागू झालेल्या कर्मचात्यांपोटी होणाऱ्या खर्चास आजची ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत सूचक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १७. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे I-Toilets (Smart Toilets) बसविणेबाबत कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकिय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात उर्वरीत ८ प्रभागात अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त I- Toilets बसविणेबाबत. (१० वर्ष देखभाल -दुरुस्तीसह )व त्यासाठी होणाऱ्या रक्कम रु.७२.०० लक्ष खर्चास (टेंडर रक्कमेच्या २५% रक्कमेची महानगरपालिकेच्या नावे बँक गॅरेंटी घेऊन) हि सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे असे ही सभा ठरवित आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.विया पाटील सूचक :- मा.श्री.सुदेश चौधरी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| १८. | व्हॅलेरियन रॉड्रीक्स ॲण्ड कं. यांनी सादर केलेल्या देयकाबाबत. | ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेने सन २०१६-१७, २०१७-१८ या वित्तीय वर्षात आयकर, व्हॅट, सेवाकर, व इतर शासकिय कराचा भरणा विषय अनुषंगिक सर्व कामे करणे व याबाबत होणारे अपिल याकामाचे मे. व्हॅलेरियन रॉड्रीक्स ॲड कं. यांनी सादर केलेले उपरोक्त दर्शविलेली रक्कम १४,१०,३२५/-अदा करणेस तसेच सन २०१८-१९ या वित्तीय वर्षातील आयकर, जी.एस.टी. व इतर शासकिय कराचा भरणा विषय अनुषंगिक सर्व कामे करणे व याबाबत होणारे अपिल याकामासाठी मे. व्हॅलेरियन रॉड्रीक्स ॲड कं. यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील संविदा प्रकरण ५ मधील ५:२:२ च्या अन्वये नियुक्ती देणेस व याबाबत येणा-या खर्चास ही स्थायी समिती सभा प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १९. | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महा अभियान सुर्या (टप्पा -३ ) पाणी पुरवठा योजना नालासोपारा विरार दरम्यान पश्चिम रेल्वेच्या ५६/१२ बी-१३ येथे जलवाहिनी रेल्वे क्रासींगसाठी भुमीगत अंथरणे कामी रेल्वेच्या पॅनलवरील सल्लागार यांच्या नेमणूकीस व त्यांसाठीच्या खर्चास सुधारीत आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- वरिलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन असे ठरविण्यांत आले की, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत सुर्या टप्पा -३ पाणी पुरवठा योजनेची मुख्य जलवाहिनी नालासोपारा- विरार दरम्यान रेल्वे क्रॉसिंग कामी मे.राइट्स लिमिटेड (भारत सरकार उपक्रम), मुबंई, सल्लागार यांनी एकुण ७ महिने सदरचे काम केले असल्याने प्रति महिना रु.५ लक्ष या प्रमाणे होणाऱ्या एकुण रु.३५ लक्ष खर्चास हि सभा सुधारीत आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री.किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २०. | वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दि. २५/०६/२०१८ ते दि. ०१/०७/२०१८ या कालावधीत लागलेल्या आगी व झालेल्या दुर्घटनांचे प्रतिवृत्त माहितीसाठी स्थायी समितीस सादर. | ठराव :- प्रस्तावात नमुद केलेनुसार उक्त कालावधीत लागलेल्या आगी व झालेल्या दुर्घटनेचे प्रतिवृत्त जे माहितीसाठी सभेस दिलेले आहे, त्याचे सभेने अवलोकन केले व त्यास ही सभा एकमताने मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्रीम. विद्या पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २१. | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कललम १०५ नुसार प्रभाग समिती एफ पेल्हार विभाग, समिती जी-वालीव विभाग व त्या अंतर्गत येणाऱ्या उपविभागीय कार्यालयांचे लेखापरिक्षण | ठराव :- लेखापरिक्षण विभागाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती एफ-पेल्हार विभाग, प्रभाग समिती जी- वालीव विभाग व त्या अंतर्गत येणाऱ्या उपविभागीय कार्यालयांचे दि.१ एप्रिल,२०१६ ते दि.३१ मार्च, २०१७ या आर्थिक वर्षातील लेखापरिक्षण अहवालास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.विद्या पाटील सूचक :- मा.श्रीम.दिक्षा घरत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| | अहवाल मा. स्थायी समिती सभेपुढे सादर करणेबाबत. | |
| २२. | औषधे प्रयोगशाळा रसायने व साथ प्रतिबंधक लस पुरवठा करणे कामी मागविण्यात आलेल्या ई-निवेदेस मा.स्थायी समितीच्या मंजुरीची आवश्यकता असल्याने सदरचा विषय मंजुरीस्तव सादर. | ठराव :- औषधे, प्रयोगशाळा रसायने व साथ प्रतिबंधक लस पुरवठा करणेकामी मागविण्यात आलेल्या ई-निविदेस मा.स्थायी समितीच्या मंजुरीची आवश्यकता असल्याने सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, वरील नमुद घटकांचे दर योग्य व वाजवी आहेत. सदरची ई-निविदा मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी तपासून मंजुरीस शिफारस केली आहे. तसेच दि.२०/०७/२०१८ रोजीच्या निविदा समितीने अंतिम मान्यतेस्तव शिफारस केलेली आहे. तरी वरील नमुद भाग A व भाग B मधील घटकांच्या कमी दराच्या ई-निविदाकारांबरोबर महाराष्ट्र महापालिका अधिनियम ७३(क) अन्वये संविदा करण्यांस ही सभा मंजुरी देत आहे. तसेच सन २०१८-१९ व २०१९-२० या वर्षाकरीता औषधे, प्रयोगशाळा रसायने व साथ प्रतिबंधक लस खरेदी करणेकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री.पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २३. | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील जि.प. शाळेतील व अनाथआश्रमातील मुलींना मासिक पाळीचे पॅड (सॅनेटरी नॅपकिन) पुरवठा करणेबाबत. | ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील जि.प शाळेत शिकत असलेल्या इयत्ता ५ वी ते ८ वी पर्यंतच्या ४००० विदयार्थ्यांना व आश्रम शाळेतील अदांजे ४०० मुलींना या योजनेचा लाभ देण्यात यावा तसेच पॅकेटवर महानगरपालिकेचा लोगो साहित छापून नॉट फॉर सेल असे नमुद करण्यात यावे. साहित्य वाटप करण्याकरिता महानगरपालिकेच्या वाहन विभागा मार्फत वाहने व मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात यावे. या करिता मा. महिला बालकल्याण समिती सभा ठराव क्र. २ दिनांक :- ०७/०७/२०१८ रोजी मान्यता देण्यात आली असून एकुण अदांजे ४४०० मुलींना एका वर्षाकरिता वाटप करण्यातकरिता लागणा-या ८८,००० पॉकेटस मागविण्या करिता ई-निविदा प्रक्रिया करुन खरेदी करणे कामी येणा-या ३५,२०,०००/- (पस्तीस लाख वीस हजार रु. मात्र) खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्रीम. सुषमा लोपीस**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २४. | सन २००१८-१९, सन २०१९-२० व २०२०-२१ ह्या वित्तीय वार्षीक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील अस्तित्वातील उद्याने व नव्याने तयार होणारे उद्याने सुशोभिकरण करणेकामी लालमाती व शेणखत पुरविणे व पसरविणे, शोभिवंत रोपे व हिरवळ (लॉन) पुरविणे व लावणे व ३ वर्ष निगा राखणे | ठराव :- सदर कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.७ दि.१७/०२/२०१८ अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा केली असता प्राप्त निविदांपैकी मे.बालाची इन्फ्राप्रोजेक्ट, मे.प्रणिक एंटरप्रायजेस, मे.दिपेश लॅन्डस्केप एंटरप्राजेस, मे.निसर्ग एंअरप्रायजेस, मे.ॲस्थेटीक लॅन्डस्केपींग, मे.हिरावती एंटरप्रायजेस, मे.रॉयल डेकोर, मे.बाबा कन्स्ट्रक्शन,हयांची निविदा दर लघुत्तम आहे तसेच पॅनलवरील सर्व निविदाधारक मे.बालाची इन्फ्राप्रोजेक्ट, मे.प्रणिक एंटरप्रायजेस, मे.दिपेश लॅन्डस्केप एंटरप्राजेस,मे.आर.एस.कन्स्ट्रक्शन, मे.निसर्ग एंअरप्रायजेस, मे.ॲस्थेटीक लॅन्डस्केपींग, मे.हिरावती एंटरप्रायजेस, मे.रॉयल डेकोर, मे.बाबा कन्स्ट्रक्शन, हयांनी दि.०५/०४/२०१८ रोजी आपल्या लेखी पत्राद्वारे सदरच्या निम्नतम दराने काम करणेची तयारी दर्शविली असून महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये हया कमी दराच्या निविदा दरास मा. निविदा समिती व मा.आयुक्त हयांनी मान्यता दिली असून एकुण १३ निविदाधारकांचे पॅनल करण्यास व संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त हयांनी मा.स्थायी समिती कडे मंजुरीसाठी शिफारस केली आहे. महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस व एकूण १३ निविदाधारकांचे |

| | | |
|---|---|---|
| | कामी प्राप्त झालेल्या निविदांबाबत निश्चित करण्यात आलेले दर (वाटाघाटीनुसार) मंजूर करुन संविदा करणे व एकूण १३ निविदाधारकांचे पॅनल तयार करणे या सर्व बाबींस प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करणेबाबत. | पॅनल करणेस ही सभा मान्यता देत आहे व पॅनलवरील नियुक्त निविदाधारकांना उद्यान कामांचे वाटपाचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणेत येत आहेत.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्रीम.विद्या पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २५. | सन २००१८-१९, सन २०१९-२० व २०२०-२१ ह्या वित्तीय वार्षीक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील अस्तित्वातील दुभाजक व नव्याने तयार होणारे दुभाजक सुशोभिकरण करणेकामी लालमाती व शेणखत पुरविणे व पसरविणे, शोभिवंत रोपे पुरविणे व लावणे व ३ वर्ष निगा राखणे कामी प्राप्त झालेल्या निम्नतम दरास प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करणेबाबत. | ठराव :- सदर कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.८ दि.१७/०२/२०१८ अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द केली असता प्राप्त निविदांपैकी मे.ॲस्थेटीक लॅण्डस्केपिंग हयांनी दि. ०५/०४/२०१८ रोजी लेखी पत्राद्वारे वाटाघाटीअंती निश्चित निम्नतम दराने काम करणेची तयारी दर्शविली असल्याने मा.स्थायी समिती मे.ॲस्थेटीक लॅण्डस्केपिंग यांच्या निश्चित निम्नतम दरास मान्यता देत आहे व त्यांचेबरोबर महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २६. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागातील कार्यरत असलेल्या विविध पदांवरील कर्मचा-यांना शासनाच्या अध्यादेशानुसार वाढलेला महागाई भत्त्यात वाढ करुन देणेबाबत. | ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागातील कार्यरत असलेल्या विविध पदावरील कर्मचाऱ्यांना शासनाच्या अध्यादेशानुसार वाढलेला महागाई भत्त्यात वाढ करुन देणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात महानगरपालिकेची दोन रुग्णालये, दोन माता बाल संगोपन केंद्र, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केद्र व ९ दवाखान्यात वैद्यकीय आरोग्य विभागाच्या कामकाजासाठी कार्यरत असलेले तज्ञ वैद्यकीय अधिकारी- एम.बी.बी.एस, वैद्यकीय अधिकारी- बी.ए.एम.एस, पी.एच.एन, जी.एन.एम, ए.एन.एम, फार्मासिस्ट, प्रयोगशाळा सहाय्यक, क्ष-किरण सहाय्यक, समुपदेष्टा, शितसाखळी तंत्रज्ञ, डायलेसीस सुपरवायझर,डायलेसीस टेक्निशियन या पदांची आवश्यकता असल्याने महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३(३) या मा. आयुक्त यांना असलेल्या अधिकारा अंतर्गत आरोग्य समितीच्या व स्थायी समितीच्या पुर्व मंजूरीने सदर नेमणूका १ दिवसाचा तांत्रिक खंड देवून ६ महिन्याच्या कंत्राटी पध्दतीने पुढे चालू ठेवणेस आरोग्य समितीने दि.२८/११/२०१७ ठराव क्रमांक ०९ अन्वये मान्यता दिलेनुसार व मा. स्थायी समितीने दि.१२/१२/२०१७ ठराव क्रमांक ४४६ अन्वये मान्यता घेण्यांत आली होती. आता मा. स्थायी समिती ठराव क्रमांक १६७ दि.१६/०७/२०१८ च्या ठरावान्वये सदरहू पदांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन ६ महिन्याच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली असून सदर पदावर नेमलेल्या कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या धोरणानुसार त्या पदांच्या नियमित वेतन श्रेणीच्या पहिल्या टप्प्यावरील वेतन व भत्ते मिळून होणाऱ्या (उदा. मुळ वेतन + ग्रेड पे + महागाई भत्ता + घरभाडे भत्ता + प्रवास भत्ता) वेतनाच्या ९०% इतके वेतन दि.१ एप्रिल |

| | | |
|---|---|---|
| | | २०१७ पासून अदा करण्याकरिता मा. सर्वसाधारण सभा सूचना क्र.११ सभा दि.२०/०२/२०१६ ठराव क्रमांक १४ अन्वये महासभेने मान्यता दिलेली असताना वैद्यकीय आरोग्य विभागातील वरील अस्थायी कर्मचाऱ्यांना माहे जून २०१७ पासून वाढलेले वेतन व भत्ते वेतनाच्या ९०% देण्यांत आलेले आहे. त्यावेळेस महागाई भत्ता १२२% टक्याने देण्यात आलेला होता. सध्या महागाई भत्त्यात वाढ होवून १३६% झालेला आहे. तरी शासन निर्णयानुसार वाढलेला महागाई भत्ता माहे ऑगस्ट २०१८ पासून वेतनात समाविष्ट करुन अदा करणेस ही सभा मंजुरी देत असुन याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री.किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २७. | **<u>वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विजय नगर तुळींज रुग्णालयासाठी आवश्यक वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस.) कंत्राटी पद्धतीने ६ महिन्यांसाठी अस्थायी स्वरुपात नियुक्ती करणेस मान्यता मिळणेबाबत.</u>** | ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विजयनगर-तुळींज रुग्णालयासाठी आवश्यक वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस) कंत्राटी पध्दतीने ६ महिन्यासाठी अस्थायी स्वरुपात नियुक्ती करणेस मान्यता मिळणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महानगरपालिकेची २ रुग्णालये, २ माता बाल संगोपन केंद्र तसेच विविध ठिकाणी २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व ९ दवाखाने येथे मा. आयुक्त यांना असलेल्या अधिकारा अंतर्गत तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्यांच्या कालावधी साठी कंत्राटी पध्दतीने वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात येत असून यामार्फत महानगरपालिकेच्या रुग्णालये, मा.बा.सं.केंद्रे, ना.प्रा.आ.केंद्रे, दवाखाने यांचेकडून आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहे. परंतु विजय नगर-तुळींज रुग्णालयातील कार्यरत असलेल्या ६ वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस.) यांनी राजीनामा दिल्याने रुग्णालयात रुग्णांना सेवा देणेस मोठया प्रमाणात अडचणी निर्माण होत आहेत. सबब ६ वैद्यकीय अधिकाऱ्यांनी राजीनामा दिलेला असल्याने सदरची रिक्त पदे असल्याने व आरोग्य सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याने पदे रिक्त राहील्याचा विपरीत परिणाम आरोग्य सेवेवर होईल. यास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३(३) या मा. आयुक्त यांना असलेल्या अधिकारा अंतर्गत तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्यांच्या कालावधी साठी कंत्राटी पध्दतीने वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस. व बी.ए.एम.एस./ कर्मचारी ही पदे वर्तमान पत्रात जाहिर सुचना प्रसिध्द करुन दि.२४/०४/२०१७ ते दि.२६/०४/२०१७ रोजी थेट मुलाखती घेण्यात आलेल्या असून या मुलाखतीच्या प्रक्रियेमधील प्रतिक्षा यादीमधून संवर्ग निहाय रिक्त असलेली ६ वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस.) पदे भरणेकामी पुढील कार्यवाही होणेस ही सभा मंजुरी देत असुन याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

नगरसचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका